**<u>नियमित फौजदारी खटला क्र. ७५/२०१९</u>**

**<u>निशाणी ६४</u>**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रं. २ यांचा जबाब शपथेवर सुरू</u>**

**माझे नांव –** डॉ. रणजित सदाशिव पाटील

**वय –** ४६ **वर्षे,** **व्यवसाय –** वैद्यकीय व्यवसाय.

**रा. –** कामेरी. सध्या– इस्लामपूर, **ता.** वाळवा, **जि.** सांगली.

**<u>सरतपासणी अभियोग पक्षातर्फे श्री एस. बी. जाधव सहा. सरकारी अभियोक्ता यांचेतर्फे</u>**

इस्लामपूर येथे मी, माझे आई–वडील, माझी पत्नी व मुल असे मिळून राहतो. माझा भाऊ राजेंद्र सदाशिव पाटील इस्लामपूर येथे राहतो. मी व माझी पत्नी 'प्रकृती आयुर्वेदीक चिकित्सालय' या नावाने दवाखाना चालवितो. राजेंद्र हॉस्पीटलचे कामकाज पाहतो. घटना दिनांक २५/११/२०१८ रोजी संध्याकाळी ७:३० वाजता माझ्या हॉस्पीटलमधील माझ्या केबीनमध्ये घडली होती. त्यादिवशी संध्याकाळी ७:१५ वाजता मी दवाखान्यामध्ये राऊंड घेण्यासाठी निघालो होतो. दोन पेशंटची तपासणी केल्यानंतर माझ्या केबीनमधून आवाज आला. त्यानंतर मी माझ्या केबीनकडे गेलो असता एक इसम माझ्या केबीनमधील ड्रॉवरमधून पैसे चोरुन घेवून जात असताना राजेंद्र व अंजुम मुलाणी यांनी पकडल्याचे दिसले. त्यानंतर आम्ही इस्लामपूर पोलिस ठाण्यात फोन केला, त्यानंतर पोलिस आले व आरोपीला घेवून गेले. केबीनमध्ये काही रक्कम खाली पडल्याचे आढळून आले व सदर इसमाचे ताब्यात ३०२०/– रुपये आढळून आले. सदर इसमाचे हातात स्क्रू ड्रायव्हर होता. घटनेबाबत राजेंद्र याने तक्रार दिली होती. ज्या इसमाला पकडले होते, त्याने त्याचे नाव रोहित आकळे रा. केदारवाडी असल्याचे सांगितले होते. एक इसम दवाखान्याबाहेर दुचाकीवर बसला होता. त्याचे नाव महादेव माने, रा. विठ्ठलवाडी असल्याचे समजले. पोलिसांनी माझा जबाब नोंदविला होता. रोहित आकळे याला मी पाहिल्यास ओळखू शकतो. तो आज न्यायदालनात हजर नाही. चोरी गेलेले

पैसे अद्याप मिळाले नाहीत. रोहित आकळे याचे हातात असलेला स्क्रू ड्रायव्हर पाहिल्यास मी ओळखू शकतो. आता मला आर्टीकल 'अ' दाखविला, तो रोहित आकळे याचे हातात होता.

**<u>उलटतपासणी आरोपीतर्फे श्री. एस. एम. नवाळे विधीज्ञ.</u>**

घटनेच्या दिवशी ड्रॉवरमध्ये किती रकमेच्या नोटा होत्या, हे मला सांगता येत नाही.  घटना माझ्यासमक्ष घडली नाही. ड्रॉवरमधील नोटांचे नंबर मला सांगता येत नाहीत. सरतपासणी दरम्यान घटनेबाबत मी जे काही सांगितले आहे ते खोटे आहे, हे म्हणणे खोटे आहे. मी खोटी साक्ष देत आहे, हे म्हणणे खोटे आहे.

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत.

KARLEKAR BHAGWAN MAHAJAN
Digitally signed by KARLEKAR BHAGWAN MAHAJAN
Date: 2026.02.23 18:57:17 +0530

**इस्लामपूर.** **(भगवान म. कारलेकर)**

**दिनांकः– २३/०२/२०२६** **अति. मुख्य न्यायदंडाधिकारी, इस्लामपूर.**